**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

**दिनांक ०२/०४/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ५ कि.मी. अंतरावरील उमरेड ते धुरखेडा रोड एन.एम.पि. कंपनीच्या जवळ उमरेड येथे दिनांक ३१/०३/२२ चे १८.५५ वा. ते १९.३० वा. सुमारास आरोपी वाहन चालकाने आपला ट्रक क्र. एम. एच. ४० बि.जी. ६५७९ उमरेड धुरखेडा रोडवर धोकादायक स्थितीत नादुरूस्त ट्रक उभे ठेवुन ट्रकला कुठलाही ईन्डीकेटर व सुचनाफलक न लावता. रस्त्यावर उभा ठेवला. यातील मोटरसायकल क्र. एम.एच. ४०/ टी ९८६७ आरोपीच्या ट्रकला धडकल्याने अपघातात मोटरसायकल चालक दिलीप नामदेवराव झाडे वय ६० वर्ष व त्यांच्या पत्नी— सौ. विना दिलीप झाडे वय ५० वर्ष दोन्ही रा. नांद, ता. भिवापुर हे जखमी होवुन उपचारा दरम्यान सौ. विना दिलीप झाडे हि मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावली.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार आनंद धात्रक पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३३८, ३०४ (अ), २८३ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी हा घटनास्थळरवरून पसार झाला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री राजेश पाटील मो.न. ९०४९९८९३४१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा खापरी फाटा येथे दिनांक ३०/०३/२२ चे २३.०० वा. ते २३.१५ वा. सुमारास एमएच— ४०/व्हाय— ३७०४ क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील टिप्परला मागच्या बाजुला रिफलेक्टर किंवा लाईट न लावता व कोणत्याही प्रंकारचे ट्रक बंद असल्याबाबत कोणत्याही प्रकारची उपाययोजना न करता येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडथळा निर्मान होईल अश्या स्थितीत आपले वाहन उभे करून ठेवल्याने एम.एच— ३१/सी.डी— ७३५१ क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक गौतम श्रीराम मेश्राम, वय ५० वर्ष, रा. निरवा यांचे मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा चांगदेव कुथे पोस्टें कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २८३, ३०४ (अ) भादवी १०४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री बोरकर मो.क्र. ८३२९१३०४५८ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कुही**— दिनांक ०१/०४/२०२२ चे ११.०० वा. ते २३.१५ वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादीयांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही शाळेत गेली परंतु शाळेतुन घरी परत आली नाही. फिर्यादी यांच्या मुलीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री देवीदास ठमके मो.क्र. ७७८८५५३१३९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**